**उमेद-महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा तथा सह जिल्हा अभियान संचालक, उमेद व गट विकास अधिकारी यांना जबाबदारी देणेबाबत...**

**महाराष्ट्र शासन**

शासन परिपत्रक क्रमांक एमएसआरएलएम-२०१७/प्र.क. २४९ / योजना -३

ग्रामविकास विभाग

बांधकाम भवन, मर्झबान रोड, मुंबई

दिनांक - ०७ डिसेंबर, २०१७

**वाचा -** १) शासन निर्णय क्रमांक एनआरएलएम २०११/प्र.क. ११६/ योजना ३, ग्रामविकास विभाग, दिनांक १८/०७/२०११

२) शासन निर्णय क्रमांक एनआरएलएम-२०११/प्र.क्र.११६/योजना ३ ग्रामविकास विभाग, दिनांक १९/१०/२०११

३) शासन निर्णय क्रमांक मजिअ-२०१२/प्र.क्र.४२/योजना ३ ग्रामविकास विभाग, दिनांक ३१/०३/२०१२

४) शासन निर्णय क्रमांक एमएसआरएलएम-२०११/प्र.क्र.१९३/योजना ३ ग्रामविकास विभाग, दिनांक ३/१०/२०१२

५) शासन निर्णय क्रमांक एमएसआरएलएम-२०१२/प्र.क्र.२८१/योजना ३, ग्रामविकास विभाग दिनांक १५/१२/२०१२

६) शासन निर्णय क्रमांक मजिअ-२०१३/प्र.क्र.३६/योजना ३ ग्रामविकास विभाग, दिनांक २०/०३/२०१३

७) शासन निर्णय क्रमांक मजिअ-२०१३/प्र.क्र.१४३/योजना ३ ग्रामविकास विभाग, दिनांक २१/०५/२०१३

८) कार्यालयीन परिपत्रक क्रमांक ०७ दिनांक २०/०३/२०१३

९) राज्यस्तरीय कार्यकारी समिती दिनांक १ जानेवारी २०१४ चे इतिवृत्त व त्यानुसार परिपत्रक क्रमांक एमएसआरएलएम/एचआर/३६/जा.क्र.५१७/२०१४ दिनांक १४ मार्च २०१४

१०) राज्यस्तरीय कार्यकारी समिती दिनांक १२ फेब्रुवारी २०१५ चे इतिवृत्त त्यानुसार परिपत्रक क्रमांक एमएसआरएलएम २०१५/प्र.क.३५/जा.क्र.३३६/प्रशा दिनांक १३/०२/२०१५

११) दिनांक २१/११/२०१७ रोजी संपन्न राज्यस्तरीय कार्यकारी समितीची बैठक

महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत सद्यस्थितीत १५ जिल्हे व १३४ तालुक्यात इन्टेन्सिव्ह पध्दतीने तर उर्वरित तालुक्यांमध्ये सेमी व नॉन इन्टेन्सिव्ह पध्दतीने काम करण्यात येत आहे. संदर्भ क्रमांक ०३ अन्वये राज्यात प्रत्येक इन्टेन्सिव्ह जिल्ह्यात व तालुक्यात अनुक्रमे जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष व तालुका अभियान व्यवस्थापन कक्षांची स्थापना करण्यात आलेली आहे. तसेच राज्यस्तरापासून ते ग्रामस्तरापर्यंत स्वतंत्र, सर्मपित व संवेदनशील यंत्रणा निर्माण करण्यात आलेली आहे. संदर्भ क्रमांक ०६ अन्वये सेमी व नॉन इन्टेन्सिव्ह पध्दतीने अभियान राबविण्याची जबाबदारी जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेस देण्यात आलेली आहे. संदर्भ क्रमांक ०१ अन्वये जिल्हास्तरावर प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा हे जिल्हास्तरीय कार्यकारी समितीचे सहअध्यक्ष असून त्यांना ०६ व ०७ अन्वये त्यांना जिल्हास्तरावर पदसिध्द सह जिल्हा अभियान संचालक म्हणून घोषित करण्यात आले आहे. तसेच संदर्भ क्रमांक ०१ अन्वये तालुकास्तरावर गट विकास अधिकारी यांना तालुकास्तरीय कार्यकारी समितीचे अध्यक्ष म्हणून घोषित करण्यात आलेले आहे.

राज्यस्तरीय कार्यकारी समितीच्या मान्यतेने जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्षातील अधिका-यांना संदर्भ क्रमांक ०९ व १० अन्वये प्रशासकीय, वित्तीय आणि धनादेशावर स्वाक्षरीचे अधिकार प्रदान करण्यात आलेले होते. राज्यात अभियानाची व्याप्ती वाढत असून त्यामध्ये अधिक प्रभावीपणे काम करता यावे यासाठी इन्टेन्सिव्ह जिल्ह्यात, जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्षात प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा यांचा प्रत्यक्ष अभियान अंमलबजावणीमध्ये सहभाग वाढविणे तसेच जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्षातील अधिका-यांना संदर्भ क्रमांक ९ व १० अन्वये देण्यात आलेल्या प्रशासकीय, वित्तीय आणि धनादेशावर स्वाक्षरीचे अधिकारात सुधारणा करण्याची बाब विचाराधीन होती. तरी **दिनांक २१ नोव्हेंबर २०१७ रोजीच्या राज्यस्तरीय कार्यकारी समिती बैठकीत झालेल्या निर्णयान्वये जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्षातील जिल्हा अभियान व्यवस्थापक यांना यापुर्वी संदर्भ क्रमांक ९ व १० अन्वये देण्यात आलेल्या प्रशासकीय, वित्तीय आणि धनादेशावर स्वाक्षरीचे अधिकारात सुधारणा करण्यास मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. त्यानुसार जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्षातील अधिका-यांना सुधारीत प्रशासकीय, वित्तीय आणि धनादेशावर**

Scanned by CamScanner

**स्वाक्षरीचे अधिकार प्रदान करण्यात येत असून त्याची सविस्तर माहिती सोबत *प्रपत्र* - *'अ'* मध्ये देण्यात आलेली आहे.** तरी त्यानुसार कार्यवाही करण्यात यावी. ज्या बाबींचा उल्लेख ***प्रपत्र* - *'अ'*** मध्ये नाही त्या बाबींमध्ये कोणताही बदल करण्यात आलेला नाही. तसेच सध्या प्रकल्प संचालक यांना नॉन इन्टेसिव्ह जिल्हयामध्ये असलेले प्रशासकीय अधिकाराप्रमाणेच इन्टेसिव्ह जिल्हयामध्येही प्रशासकीय अधिकार राहतील.

तालुकास्तरावर गट विकास अधिकारी यांना संदर्भ क्रमांक ०१ च्या शासन निर्णयान्वये तालुकास्तरीय कार्यकारी समितीचे अध्यक्ष म्हणून घोषित करण्यात आलेले आहे. नॉन इन्टेंन्सिव्ह जिल्ह्यात महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानाची अंमलबजावणी गट विकास अधिकारी यांच्यामार्फत करण्यात येते. परंतु इन्टेंन्सिव्ह तालुक्यांमध्ये अभियानाच्या अंमबलबजावणी मध्ये गट विकास अधिकारी यांचा सहभाग वाढविणे आवश्यक आहे. तरी इन्टेंन्सिव्ह तालुक्यात गट विकास अधिकारी यांनी महिन्यातून किमान एकदा तालुका अभियान व्यवस्थापन कक्षाची आढावा बैठक घेऊन अभियानाचा आढावा घ्यावा व तालुका अभियान व्यवस्थापन कक्षास नियमित मार्गदर्शन करावे. तालुका अभियान व्यवस्थापक यांनी गट विकास अधिकारी यांना नियमित अहवाल (रिपोर्टींग) सादर करावे. स्वयंसहाय्यता गटांना कृतीसंगमाच्या माध्यमातून विविध शासकीय योजनांचा लाभ मिळावा यासाठी ग्रामसेवक व गावपातळीवरील इतर शासकीय यंत्रणेचा जास्तीत जास्त सहभाग अभियानातंर्गत वाढविण्यासाठी गट विकास अधिकारी यांनी प्रयत्न करावे. तसेच अभियानांचे तालुक्यास्तरावरील प्रस्ताव प्रकल्प संचालक यांना गटविकास अधिकारी यांनी सादर करावेत.

सदरील आदेशाची तातडीने अंमलबजावणी करण्यात यावी.

**(असीम गुप्ता )**
**सचिव**
**ग्रामविकास विभाग**
**महाराष्ट्र शासन**

सोबत: प्रपत्र - *'अ'*

**प्रत:-**

१. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान, बेलापूर, नवी मुंबई यांना माहितीस्तव
२. उपसचिव (योजना), ग्रामविकास विभाग, बांधकाम भवन, मुंबई यांना माहितीस्तव
३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद तथा जिल्हा अभियान संचालक, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान पालघर, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, नाशिक, सोलापूर, उस्मानाबाद, बीड, जालना, नंदुरबार, यवतमाळ, वर्धा, गोंदिया, गडचिरोली व चंद्रपूर यांना माहितीस्तव तथा उचित कार्यवाहीसाठी अग्रेषित.
४. उपायुक्त (विकास), विभागीय आयुक्त कार्यालय (सर्व), यांना माहितीस्तव अग्रेषित.
५. प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा तथा सह जिल्हा अभियान संचालक, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान पालघर, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, नाशिक, सोलापूर, उस्मानाबाद, बीड, जालना, नंदुरबार, यवतमाळ, वर्धा, गोंदिया, गडचिरोली व चंद्रपूर यांना माहितीस्तव तथा उचित कार्यवाहीसाठी अग्रेषित.
६. जिल्हा अभियान व्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान, पालघर-ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, सोलापूर, उस्मानाबाद, बीड, जालना, नंदुरबार, यवतमाळ, वर्धा, गोंदिया, गडचिरोली व चंद्रपूर यांना माहितीस्तव तथा उचित कार्यवाहीसाठी अग्रेषित.
७. जिल्हा समन्वय अधिकारी (सर्व), राज्य अभियान व्यवस्थापन कक्ष, बेलापूर, नवी मुंबई यांना माहितीस्तव.
८. विभाग प्रमुख (सर्व), राज्य अभियान व्यवस्थापन कक्ष, बेलापूर, नवी मुंबई यांना माहितीस्तव.
९. प्रशासन/लेखा शाखा, राज्य अभियान व्यवस्थापन कक्ष, बेलापूर, नवी मुंबई
१०. मनुष्यबळ शाखा, राज्य अभियान व्यवस्थापन कक्ष, बेलापूर, नवी मुंबई

Scanned by CamScanner

प्रपत्र - 'अ'

## महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानातंर्गत

जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्षातील अधिका-यांना प्रशासकीय, वित्तीय व धनादेश स्वाक्षरीचे अधिकार प्रदान करणेबाबत

(सहपत्र- शासन परिपत्रक परिपत्रक क्रमांक एमएसआरएलएम/प्र.क्र. /जा.क्र. /२०१७, दिनांक नोव्हेंबर २०१७)

| Sr. No. | Particulars | Existing delegation of Power | | | Rervised delegation of Power | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | Authority of Approval | Cheque signing authority | Extent of Power | Authority of Approval | Cheque signing authority | Extent of Power |
| 1 | Salary | District Mission Manager, MSRLM | District Mission Manager, MSRLM & Account Officer, MSRLM | Full Power | Project Director, DRDA / Joint District Mission Director , MSRLM | Project Director, DRDA / Joint District Mission Director , MSRLM & District Mission Manager, MSRLM | Full Power |
| 2 | All Office Expenses other the Salary | Chief Executive Officer, ZP / District Mission Director, MSRLM | Chief Executive Officer, ZP / District Mission Director, MSRLM & District Mission Manager, MSRLM | Above 50,000/- (upto Rs 20 Lakhs) | Chief Executive Officer, ZP / District Mission Director, MSRLM | Chief Executive Officer, ZP / District Mission Director, MSRLM & Project Director, DRDA / Joint District Mission Director , MSRLM | Above 1,00,000/- (upto Rs 20 Lakhs) |
| 3 | | District Mission Manager, MSRLM | District Mission Manager, MSRLM & Account Officer, MSRLM | Upto 50,000/- | Project Director, DRDA / Joint District Mission Director , MSRLM | Project Director, DRDA / Joint District Mission Director , MSRLM & District Mission Manager, MSRLM | Above 10,000/- (Upto 1,00,000/-) |
| 4 | | | | | District Mission Manager, MSRLM | District Mission Manager, MSRLM & Account Officer | Upto 10,000/- |
| 5 | Training Expenses | Not Applicalbe | | | Chief Executive Officer, ZP / District Mission Director, MSRLM | Chief Executive Officer, ZP / District Mission Director, MSRLM & Project Director, DRDA / Joint District Mission Director , MSRLM | Above 1,00,000/- (upto Rs 20 Lakhs) |
| 6 | | | | | Project Director, DRDA / Joint District Mission Director , MSRLM | Project Director, DRDA / Joint District Mission Director , MSRLM & District Mission Manager, MSRLM | Upto 1,00,000/- |
| 7 | Tour Advance | Chief Executive Officer, ZP / District Mission Director, MSRLM | Chief Executive Officer, ZP / District Mission Director, MSRLM & District Mission Manager, MSRLM | Above 5000/- upto Rs 25,000/- | Chief Executive Officer, ZP / District Mission Director, MSRLM | Chief Executive Officer, ZP / District Mission Director, MSRLM & Project Director, DRDA / Joint District Mission Director , MSRLM | Above Rs 5000/- (upto Rs. 25,000) |
| 8 | | District Mission Manager, MSRLM | District Mission Manager, MSRLM & Account Officer, MSRLM | Upto 5000/- | Project Director, DRDA / Joint District Mission Director , MSRLM | Project Director, DRDA / Joint District Mission Director , MSRLM & District Mission Manager, MSRLM | Upto Rs. 5,000/- |
| 9 | Program Advance | Chief Executive Officer, ZP / District Mission Director, MSRLM | Chief Executive Officer, ZP / District Mission Director, MSRLM & District Mission | Full Power | Chief Executive Officer, ZP / District Mission Director, MSRLM | Chief Executive Officer, ZP / District Mission Director, MSRLM & Project Director, | Full Power |

Scanned by CamScanner

| Sr. No. | Particulars | Existing delegation of Power | | | Rervised delegation of Power | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | Authority of Approval | Cheque signing authority | Extent of Power | Authority of Approval | Cheque signing authority | Extent of Power |
| | | | Manager, MSRLM | | | DRDA / Joint District Mission Director , MSRLM | |
| 10 | | District Mission Manager, MSRLM | District Mission Manager, MSRLM & Account Officer, MSRLM | Upto 25000/- | Project Director, DRDA / Joint District Mission Director , MSRLM | Project Director, DRDA / Joint District Mission Director , MSRLM & District Mission Manager, MSRLM | Upto Rs. 25,000/- |
| 11 | Revolving Fund. Community Investment Fund, VRF and Start-up cost Distribution | Chief Executive Officer, ZP / District Mission Director, MSRLM | Chief Executive Officer, ZP / District Mission Director, MSRLM & District Mission Manager, MSRLM | Full Power (Above Rs 10 Lakhs) (This only for RF and CIF) | Chief Executive Officer, ZP / District Mission Director, MSRLM | Chief Executive Officer, ZP / District Mission Director, MSRLM & Project Director, DRDA / Joint District Mission Director , MSRLM | Full Power (Above Rs 10 Lakhs) |
| 12 | | District Mission Manager, MSRLM | District Mission Manager, MSRLM & Account Officer, MSRLM | Rs 10 Lakhs (This only for RF and CIF) | Project Director, DRDA / Joint District Mission Director , MSRLM | Project Director, DRDA / Joint District Mission Director , MSRLM & District Mission Manager, MSRLM | Upto Rs 10 Lakhs |

(असीम गुप्ता )
सचिव
ग्रामविकास विभाग
महाराष्ट्र शासन

Scanned by CamScanner